**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक- ९७/२०२४**
**महा. शासन वि. सर्जेराव निकम**
**निशाणी क्रमांक- १९/सी**

**(शासनातर्फे साक्षीदार क्रमांक - ४ ची जबानी)**
**मी देवाशपथ खरे सांगतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | रणधीर रघुनाथ वरूटे |
| वय | - | ३५ वर्षे |
| व्यवसाय | - | नोकरी |
| पत्ता | - | कपिलेश्वर, ता : राधानगरी, जि : कोल्हापूर |

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. बी. कांबळे यांचे मार्फत -**

**१.** दि.३०/०३/२०२४ रोजी मी राधानगरी पोलीस ठाणे येथे ट्रॅफिक अंमलदार म्हणुन कार्यरत होतो. सदरील दिवशी पोलीस निरीक्षकसाो यांनी मला, पो.स.इ. घेरडीकर, पो.कॉ. २३७८ पोवार यांना राधानगरी बस स्थानक येथे पेट्रोलिंगचे तोंडी आदेश दिले. सदरील दिवशी बस स्थानकाच्या दिशेने एक मोटरसाईकल प्लॅटिना क्र.एम. एच.०९ एफ.झेड ५०६३ याला थांबविले असता मोटरसाईकलस्वार हा दारूच्या नशेत असल्यासचे दिसून आले. त्यावेळीस त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव सर्जेराव निकम रा. म्हालसवडे असे सांगितले. चौकशी केली असता त्याचेकडे मोटरवाहन परवाणा असल्यासचे त्याने सांगितले.

**२.** त्याला ताब्यात घेऊन त्याची वैद्यकीय तपासणी करणेकरिता मी, पोवार तसेच घेरडीकर यांनी त्याना राधानगरी शासकीय दवाखान्यात नेले. त्याची तपासणी करून डॉक्टरांनी अ फॉर्म घेरडीकर साहेब यांच्या ताब्यात दिला. मी सदरील अ फॉर्म पाहिलेला आहे. मला आता नि.१५ वरील अ फॉर्म दाखविण्यात आला. तो तोच आहे.

सदरील प्रकाराबाबत मी पोलीस ठाणेत आरोपी विरूध्द फिर्याद दिली. माझा फिर्यादी जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे ती मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी P20/PW4** देण्यात येते. आता मला ऑनलाईन प्रथम खबर अहवाल दाखविण्या आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी P21/PW4** देण्यात येते. आरोपीस पाहिल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. बी. पी. पाटील वकील यांचे मार्फत सुरू-**

३. हत्तीमहल जवळील स्थानकाजवळ पंचांना बोलविले असे काही घडले नाही. हत्तीमहल ते राधानगरी बस स्थानक याचेमध्ये अंदाजे १ किमी. अंतर आहे. मी पोलीसांना जबाब देतेवेळी मोटरसाईकलस्वार हा बस स्थानकाच्या दिशेने आला होता हे सांगितले होते. तसे माझे जबाबात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. पेट्रोलिंग करिता राधानगरी बस स्थानक येथे मी अंदाजे १:१५ चे सुमारास गेलो होतो. सदरील आरोपीची मोटरसाईकल थांबवणेपूर्वी अंदाजे ४ ते ५ मोटरसाईकल आम्ही थांबविल्या होत्या. सदरील मोटरसाईकल या आम्ही वाहन परवाणा तपासणी करिता थांबविल्या होत्या. मी आरोपीस परवाणा तपासणी करिता थांबवले होते. आरोपीला कशाकरिता थांबविले याचे कारण मला फिर्यादीत लिहीण्यास काही अडचण नव्हती.

४. आरोपीला थांबविण्यापूर्वी त्याला आम्ही पहिल्यांदा २०० मी. अंतरावर पाहिले होते. आरोपी २०० मी. अंतरापासून कोणत्या पध्दतीत मोटरसाईकल चालवत होता हे मला फिर्यादीत नमूद करण्यास काही अडचण नव्हती.

५. आम्ही आरोपीची पहिले वैद्यकीय तपासणी केली व नंतर पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, माझे फिर्यादीत नमूद 'त्यानंतर पो.स.इ. घेरडीकर यांनी २ पंचांना बोलवून घेतले व पंचनामा केला. त्यानंतर आम्ही सदर इसमास घेऊन वैद्यकीय..........

फॉर्म आमचेकडे दिला आहे.' हे चुकीचे नमुद आहे. वस्तुस्थिती अशी की, पहिले पंचनामा केला व नंतर वैद्यकीय तपासणी केली. हा जुना खटला असल्यामुळे मला आधी काय केले हे लक्षात आले नव्हते.

६. मी आता नि.१५ वरील वैद्यकीय अ फॉर्म पाहिला. त्यामध्ये त्याचे चालणे अस्थिर आहे असे लिहील्याचे दिसून येत नाही. असे असताना मी फिर्यादीमध्ये त्याचे अस्थिर लिहीण्याचे कारण असे की, त्याला थांबविले तेंव्हा त्याचे चालणे अस्थिर दिसुन आले होते. हे म्हणणे खरे आहे की, नि.१५ वरील फॉर्म मध्ये तसे नमूद नसताना देखील मी फिर्यादीत त्याचे चालणे अस्थिर असल्याचे चुकीचे नमूद केले आहे.

७. आरोपीला सदरील वेळी तो कोठे काम करतो व कोठून येत आहे हे विचारण्यास काही हरकत नव्हती. हे मला माहित नाही की, राज हॉटेल येथे पंचायत समीतीतील लोक जेवायला येतात किंवा कसे. पंचायत समीतीचे कार्यालय बस स्थानकाच्या कोणत्या बाजूस आहे हे मला माहीत नाही. पंचायत समीतीचे कार्यालय बस स्थानकापासून किती अंतरावर आहे हे मला सांगता येणार नाही. बस स्थानक हे राधानगरी गावच्या कोणत्या दिशेला आहे हे मला सांगता येणार नाही. बस स्थानकाच्या येथील रस्ता कोणत्या दिशेने कोणत्या दिशेला जातो हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी कोणत्या दिशेने आला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरून खोटी फिर्याद दिली आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

राधानगरी

Sd/-

दिनांक : २०/०३/२०२६

**(एन. पी. काकडे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र. २), राधानगरी